**पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण**
चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -४११००८
दुरध्वनी क्र.०२०-२५६५७८७८ फॅक्स क्र.०२०-२५६७४६४१
ई मेल- sp.pune.r@mahapolice.gov.in.
(आस्थापना शाखा)

# पोलीस शिपाई चालक भरती-२०२२-२३/लेखी परीक्षा उमेदवारांसाठी सूचना

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण आस्थापनेवर पोलीस शिपाई चालक संवर्गातील ४८ रिक्त पदांकरीता पोलीस शिपाई चालक भरती-२०२२-२३ मधील लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या ५५७ उमेदवारांची यादी दिनांक २७.०७.२०२४ रोजी या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

२. उपरोक्त भरतीसाठी ज्या मराठा उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातून आवेदन अर्ज केले आहेत. त्यांना मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.अपोमसं/प्रशिक्षण/पोशि भरती/२०२२-२३/१७३/२०२३/९६६, दिनांक १६.०७.२०२४ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे मराठा उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गाऐवजी सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग (SEBC) / इतर मागासवर्ग (OBC) / अराखीव (OPEN) यापैकी एका प्रवर्गाची निवड करुन सदर प्रवर्गासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्रे ०१ महिन्याच्या मुदतीच्या आत देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे मराठा उमेदवारांकडून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) ऐवजी सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग (SEBC) / इतर मागासवर्ग (OBC) / अराखीव (OPEN) यापैकी एका प्रवर्गाची निवड करुन घेण्यात आली असून तसे हमीपत्र संबंधित उमेदवारांकडून घेण्यात आलेले आहे.

३. तथापि प्रस्तुत प्रकरणी सन २०२२-२३ पोलीस शिपाई भरतीमध्ये लेखी परीक्षा उत्तीर्ण होवून निवड यादीत येत असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) या प्रवर्गातील काही उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) / खुला (OPEN) यापैकी एका प्रवर्गाची निवड करण्याबाबत आक्षेप दर्शविलेला आहे. सदरबाबत शासनाकडून पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत सन २०२२-२३ पोलीस शिपाई भरतीमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) प्रवर्गातून आवेदन अर्ज सादर करुन तात्पुरत्या यादीत समाविष्ठ होत असलेल्या अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द न करता ती प्रकरणे तात्पुरती स्थगित ठेवून त्यांचे प्रकरणी पुढील आदेशाची वाट पाहण्यात यावी. शासन निर्णय प्राप्त होताच याबाबत यथावकाश सर्वांना कळविण्यात येईल अशा सुचना दिलेल्या आहेत.

Scanned with OKEN Scanner
CamScanner

उपरोक्त सुचनेनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातून ज्या मराठा उमेदवारांनी .वेदन अर्ज केले आहेत आणि जे वाहनचालक कौशल्य चाचणीमध्ये पात्र झालेले आहेत त्यांना लेखी परीक्षेसाठी शासन स्तरावरील प्राप्त होणारे निर्णय/आदेश तसेच सदर प्रकरणी भविष्यात न्यायालयीन याचिका दाखल झाल्यास त्याच्या निर्णयाच्या अधिन राहून खालील उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी पात्र करण्यात येत आहे. लेखी परीक्षेचे ठिकाण व वेळ यथावकाश कळविण्यात येईल.

| SR. NO | Chest No. | Application Id | Candidate Name |
|---|---|---|---|
| 1 | 30 | 110621000000385 | NISHANT SUNIL KADLAG |
| 2 | 188 | 110621000000345 | SHUBHAM BHALCHANDRA BHOSALE |
| 3 | 561 | 110621000001637 | SOURABH SHIVAJI HARANE |
| 4 | 593 | 110621000001389 | MUNJABHAU SHIVAJI KALE |
| 5 | 722 | 110621000001537 | AVINASH MACHHINDRA PACHARNE |
| 6 | 1005 | 110621000001925 | AVISHKAR JITENDRA SABALE |
| 7 | 1011 | 110621000002046 | LAXMAN GAJENDRA MANDE |
| 8 | 1093 | 110621000002071 | NIRANJAN ANANDA TORASKAR |
| 9 | 1366 | 110621000002763 | ADESH RAJENDRA LABHADE |
| 10 | 2202 | 110621000004564 | AKSHAY VISHNU GETHE |

ठिकाण : पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण

दिनांक : ०२ /०८/२०२४

( पंकज देशमुख ) भा.पो.से.

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.

Scanned with OKEN Scanner

CamScanner